दै. मराठवाडा नेता दि. १०/०७/२५

# घरफोडी करणारे अट्टल चोरट्यांना मुद्देमालासह अटक



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोड्या करून सोन्या चांदीचा मुद्देमाल मित्रांमार्फत सराफा व्यापाऱ्यांना विकणाऱ्या अट्टल चोरट्यासह दोघांना भाग्यनगर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून चोरीत गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

भाग्यनगर पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुरन ३२१/२०२५ कलम ३३१(४), ३०५ बि.एन.एस गुन्ह्यातील संशयीत आरोपी अभिजीत ऊर्फ अभय देवराव राऊत हा संशयीतरित्या भाग्यनगर ठाण्याच्या हद्दित फिरत असल्याची माहिती मिळताच त्याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून गुरन १) ३२१/२०२५ बि.एन.एस कलम ३३१ (४), ३०५, ३१७(२) २) गुरन ३८७/२०२५ कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ बी.एन.एस ३) ३९१/२०२५ कलम ३३१ (३), ३३१(४),३०५ बी.एन.एस मधील गेला माल त्याचा मित्र योगेश मारोती पवार (वय २० वर्षे व्यवसाय मजुरी रा. बरडशेवाळा ता. हदगाव) याच्याकडे ठेवल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार सदर आरोपीच्या घरातून वरील तिन्ही गुन्ह्यांमधील गेल्या मालापैकी सोन्या चांदीचे दागिने लॅपटॉप व दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुन्ह्याचा अधिक तपास भाग्यनगर पोलीस करीत आहेत. या आरोपीतांकडुन चोरीचे आणखी काही गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

दै. पुण्यनगरी

# घरफोडी करणाऱ्या दोघांना पकडले

**नांदेड / प्रतिनिधी**

शहरातील भाग्यनगर पोलिसांनी घरफोड्या करणाऱ्या दोघांना पकडले असून त्यांच्याकडून लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे.




शहरातील सचिन दिगांबर राणे ४५ नोकरी रा.त्रिमूर्ती पार्क वाडी (बु) नांदेड, सुदाम बाबुराव गोरे रा. हरिओमनगर नांदेड, सुदर्शन हरिदास गव्हाणे दत्तनगर नांदेड यांच्या घरी घरफोडी झाली होती. या तिघांनीही भाग्यनगर पोलिस ठाणे गाठून फिर्याद दिल्याने अज्ञात आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास थंड बस्त्यात होता. मात्र पोलिस अधीक्षक अविनाश कुमार व वरिष्ठांनी विविध पोलिस ठाणे प्रमुखांना गंभीर गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने दोघांना मंगळवारी दि. ९ जुलै रोजी पकडले. या आरोपींची नावे अभिजीत ऊर्फ अभय देवराव राऊत २५ रा.बेलानगर नांदेड, योगेश मारोती पवार २० रा. बरडशेवाळा ता. हदगाव जि. नांदेड अशी आहेत. या ३ गुन्हयातील चोरीचे सोन्या चांदीचे दागिने, लॅपटॉप व २ मोबाईल असा साडे तीन लाखांचा मुद्देमाल ही जप्त करण्यात आला आहे. या आरोपींकडून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी, गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक विनोद देशमुख, पोहेकाँ प्रदीप गर्दनमारे, पोकाँ विष्णुकांत मुंडे,राहुल लाठकर,पोकाँ नागनाथ चापके, पोकॉ अंकुश कांबळे,सायबर सेल नांदेडचे राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे यांनी ही कारवाई केली.